**" प्रेस नोट"** दिनांक:-११/१०/२०१७

**भिवंडी शहरात ३० अनाधिकृत टेलिफोन एक्सेंजवर ठाणे गुन्हे शाखा, युनिट-२, भिवंडी यांनी छापे टाकून ०९ आरोपी गजाआड केले, २१,६१,१००/- रू.चा मुद्देमाल जप्त.**

गुन्हे शाखा युनिट- २ भिवंडी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शितल राऊत यांना भिवंडी शहर परिसरात अनाधिकृत टेलिफोन एक्सेंज सुरू करून परदेशातुन येणारे आंतरराष्ट्रीय व्हि.ओ.आय.पी. कॉल हे अनधिकृत सीम बॉक्सचा वापर करून त्यामध्ये भारतीय कंपनीचे सिम कार्ड्स वापरून भारतातील इच्छित मोबाईल नंबरवर कॉल केले जातात असल्याची माहीती प्राप्त झाली होती. यापुर्वी देखील अनाधिकृत टेलीफोन एक्सचेंजवर भिवंडी गुन्हे शाखेने कारवाई केलेली असतानाही अनाधिकृत टेलीफोन एक्सचेंज चे रॅकेट भिवंडी परिसरात खुलेआम चालू होते.

प्राप्त झालेल्या माहीतीच्या अनुषंगाने गुन्हे शाखेचे सहा.पोलीस आयुक्त श्री.हातोटे सो.व श्री.एन.टी. कदम सो यांनी १० अधिकारी व १०० कर्मचारी यांची विविध पथके तयार करून दि. १०/१०/२०१७ रोजी पहाटे ०४:०० वाजता गुन्हयातील अटक आरोपीतांच्या राहत्या घरी तसेच त्यांनी अनाधिकृत टेलिफोन एक्सेंज चालविण्याकरीता घेतलेल्या जागेवर छापा कारवाई केली. छापा कारवाई मध्ये अटक आरोपीत यांनी दाखविलेल्या एकुण वेग वेगळया ठिकाणाहून अनधिकृत टेलिफोन एक्सचेंज मिळुन आले. सदर ठिकाणाहून एकुण २५ सिम बॉक्स मिळुन आले. सदर बॉक्सेस मध्ये एकुण ४३८ रिलायन्स , एअरटेल, बि.एस.एन.एल., टेलेनॉर, आयडीया कंपनीचे सिमकार्डस मिळुन आले आहेत. सदरचे सिमबॉक्स हे इंटरनेट कनेक्शनला राउटरचे मार्फतीने जोडण्यात आलेले होते. सदरच्या यंत्रणेबाबत आरोपीत यांचेकडे विचारपुस केली असता त्यांनी सदरचे सिमबॉक्सला इंटरनेट कनेक्शन दिलेले असुन त्यावरून आंतरराष्ट्रिय व्ही.ओ.आय.पी. कॉल प्राप्त करण्यासाठी नमुद यंत्रामध्ये बसविलेल्या विविध सिमकार्डव्दारे परदेशातुन येणारे आंतरराष्ट्रिय व्हिओआयपी कॉल विनापरवाना राऊट करून इच्छीत भारतीय मोबाईल नंबर तथा लॅन्डलाईन नंबरशी जोडले जातात. म्हणजेच आंतरराष्ट्रीय व्ही.ओ.आय.पी. व्हॉईस कॉल हे सेल्युलर नेटवर्क मध्ये डोमॅस्टीक कॉल म्हणुन जोडले जातात. त्यामुळे भारतातील मोबाईल नंबरच्या डिस्पलेवर परदेशातील मोबाईल नंबर न येता भारतातील मोबाईल कंपनीचे नंबर येतात. त्यामुळे सदरचे फोन कोणत्याही सुरक्षा यंत्रणेला ट्रेस होत नाहीत. तसेच या कॉलची नोंद डिपार्टमेंट ऑफ टेलीकम्युनिकेशन (डीओटी ) या यंत्रणेला होत नसल्याने भारत सरकारला मिळणारा महसुल कर बुडविलेला आहे. अशा अनधिकृत टेलीफोन एक्सचेंज व्दारे होणारे कॉल हे देशविघातक व इतर अवैध, बेकायदशीर कामाकरीता वापरला जाण्याची जास्त शक्यता असुन सदरची बाब ही देशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन अतिशय गंभीर स्वरूपाची आहे. सदर बाबत शांतीनगर पोलीस स्टेशन गु.र.नं. I २९७/२०१७ भादविक ४२०, भारतीय टेलिग्राफ कायदा १८८५ मधील कलम ४,२० व २५ चा भंग केला तसेच कलम ३ व ६ इंडीयन वायरलेस टेलिग्राफी ॲक्ट १९३३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हयाचा अधिक तपास सपोनि प्रकाश पाटील हे करीत आहेत. २५ सिमबॉक्स, राऊटर, ४३८ सिमकार्ड (रिलायन्स,एअरटेल,बि.एस.एन. एल., आयडीया, लॅपटॉप, मोबाईल फोन,कनेक्टींग केबल, व इतर इलेक्टॉनिक उपकरणे असाएकुण मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर कारवाई मध्ये खाजगी टेक्नशियन श्री. जगजीतसिंग गरेवाल, श्री. मोहन भानुशाली यांची मोलाची मदत झाली आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री.परम बीर सिंह, मा. पोलीस सह आयुवत श्री. मधुकर पाण्डेय, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. मकरंद रानडे यांचे आदेशानुसार मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे). श्री.अभिषेक त्रिमुखे, सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे (शोध) श्री. मुंकुद हातोटे व श्री.एन.टी.कदम यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे घटकातील वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.नितीन ठाकरे,श्री. शितल राऊत,श्री.यशवंत चव्हाण, श्री.संजु जॉन,श्री.रनवरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप निगडे, प्रकाश पाटील,सुरेश चोपडे, अविनाश कुराडे,पो.उप निरी,संतोष चौधरी, रविंद्र पाटील, लक्ष्मण जोरी,सपोउपनि आहिरे, पो.हवा. रविंद्र पाटील, नवनाथ पारधी, दिलीप शिरसाट, विकास शिरसाठ,रमेश शिंगे,पवार, लोहार, पो.ना. किशोर माने, रहिम शेख, राजेद्रं अल्हाट, सुधाकर चौधरी, अनिल पाटील,राजेद्रं सांबरे,सत्वशिल अवचारे, प्रमोद धाडवे, प्रमोद जाधव,श्रीधर हुंडेकरी, अमिनखॉ तडवी, मपो.हवा. निता पाटील व मपोना मेघना कुंभार यांनी केली आहे.

- यापुर्वी मे २०१७ मध्ये गुन्हे शाखा, भिवंडी युनिट -२ यांनी केलेल्या अशाच प्रकारच्या छापा कारवाई मध्ये एकुण २२ सिमबॉक्स व ४२० सिमकार्ड जप्त करण्यात आले होते.
- भिवंडी परिसरातील एकुण ४ ठिकाणी चालु असलेले अनाधिकृत टेलीफोन एक्सचेंज उध्वस्त करून एकुण ११ आरोपीतांना अटक करून या प्रकरणी त्यांचे विरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
- भिवंडी परिसरात आणखी अशाच पध्दतीने अनाधिकृत टेलीफोन एक्सचेंजचे रॅकेट चालु असल्याबाबतची माहीती भिवंडी गुन्हे शाखेच्या पोलीसांना मिळाली.
- मिळालेल्या माहीतीची शहानिशा करणेकरीता खाजगी टेक्नशियन व इंटरनेट प्रोव्हायडर यांचे मदतीने १५ दिवस अनधिकृत टेलीफोन एक्सचेंज चालविणाऱ्या व्यकतींचा अभ्यास करण्यात आला आहे.
- अनधिकृत टेलीफोन एक्सचेंज चालविणारे एकूण संशयीत ३० व्यक्ती निष्पन्न करण्यात यश आले आहे.
- त्या अनुषंगाने भिवंडी परिसरात एकुण ३० वेग वेगळया ठिकाणी १० अधिकारी व ८० पोलीस कर्मचारी यांचे मदतीने छापा कारवाई करण्यात आली आहे.
- सदर छापा कारवाई दरम्यान २५ सिमबॉक्स मशिन, राउटर, ४३८ रिलायन्स,एअरटेल, बि.एस.एन. एल., टेलेनॉर,आयडीया कंपनीचे सिमकार्ड, लॅपटॉप, मोबाईल फोन इत्यादी हस्तगत करण्यात आले आहेत.
- आरोपीचे शिक्षण हे १२ वी पावेतोच झालेले असून त्यांचे मासीक स उत्पन्न ३५ ते ४० हजार रूपाये आहे. सदर आरोपी हे त्यांचे राहते घरात करीत होते. सदर आरेपी हे एकमकांचे संर्पकात आहेत अगर कसे ? याबाबत तपास चालु असून गुन्हयातील मुख्य सुत्रधार कोण आहे याचा तपास चालु आहे.
- सदर छापा कारवाई मध्ये एकुण ९ आरोपीतांना अटक करण्यात आले असून त्यांचे ताब्यातून एकुण २१,६१,१००/- रु किंमतीचा मुददेमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.

**<u>अटक आरोपीतांची नावे :-</u>**

१) नियाज अहमद मोहंमद इब्राहिम शेख वय. ४९ वर्षे शिक्षण- ८ वी राह. भिवंडी. मुळ रा. उत्तरप्रदेश

२) मोहंमद शाकिर इर्शाद अहमद मोमीन वय.२५ वर्षे शिक्षण- बी.एस.सी. राह. भिवंडी. मुळ रा. उत्तरप्रदेश

३) नदिम अली शेर अली शेख वय.२८ वर्षे शिक्षण- १२ वी राह. भिवंडी. मुळ रा. उत्तरप्रदेश

४) महंमद उमर अजीजुर्रहमान खान वय.२४ वर्षे शिक्षण- ९ वी राह. भिवंडी. मुळ रा. उत्तरप्रदेश

५) महंमद अर्शद मुमताज अहमद शेख वय.३५ वर्षे शिक्षण- १२ वी राह. भिवंडी. मुळ रा. उत्तरप्रदेश

६) महंमद फुजैल एजाज अहमद शेख वय.२८ वर्षे शिक्षण- १२ वी राह. भिवंडी. मुळ रा. उत्तरप्रदेश

७) समशाद अहमद इसामुददीन अन्सारी वय.२६ वर्षे शिक्षण- १२ वी राह. भिवंडी. मुळ रा. उत्तरप्रदेश

८) फक्रेआलम महंमद शहजहांन शेख वय.२९ वर्षे शिक्षण-९ वी राह. भिवंडी. मुळ रा. उत्तरप्रदेश

९) महंमद आलीम बद्रीजमा शेख वय.२८ वर्षे शिक्षण- ८ वी राह. भिवंडी. मुळ रा. उत्तरप्रदेश


महाराष्ट्र पोलीस


महाराष्ट्र पोलीस